मग काय
मुलींची छेड काढणाऱ्या मुलांची
बलात्काऱ्यांची, खुन्यांची कास्ट सर्टिफिकेटस पाहूनच न्यायान्यायाची
नव्यभाषा सोयीनं पायजेल तशी वाकवता येईल
छेड काढल्या गेलेल्या मुलींच्या
जीव गमावलेल्यांच्या
बलात्कारपीडितांच्या
जन्मजातधर्माच्या कुळामुळाचे सर्वप्रथम शोध लावले जातील
आता हेच अत्यंत महत्त्वपूर्ण झाले आहे
मानवही उल्ट्या उत्क्रांतीने माकडहाडाला श्रद्धापूर्वक चाचपून
स्मरण करतील
टकलावर केशरोपण करण्याचे तंत्र आलेच आहे
अंधश्रद्धा निर्मूलनाचा जुना कंगवा नव्या हेअरस्टायलीवरून फिरवता येईल
मग काय
मोर्चेबांधणीचा क्लुप्त्य टेक्नो अपडेट करता येतोच
महामोर्चे खावखुजाव बत्ती बुजाव तालावरच परेडी करतील
धमकी दिल्यासारखे खुलेआम बॅनर लावता येतील
एक लाख वगैरे
क्रांती नावाच्या नववधूचा मूकपणेच जातीच्या चारदिवारी पहाऱ्यात
गळा घोटता येईल
आणि प्रतिक्रांतीशी तिचं लगीन झाल्याचे पोस्टमार्टेम रिपोर्टस्
गहाळ करण्यात येतील
पोस्टट्रूथ कथनाचा तेरावा महिना सुरू होईल
सगळं काही बारा वाजल्यावर
जीव दिलेल्या शेतकऱ्यांच्या अव्याहत मातीच्या कार्यक्रमात
स्वामीनाथन आयोगाची बुफे ऑर्डर तोंडी लावण्यासाठी चविष्ट केलेली असेलच
मग काय
मढ्याच्या तिरडीचा बांबू सामंती गढ्यांवर झेंड्यासाठी वापरता येईल
म्हार माजले म्हणत कण्हत
गरीब दलितांच्या झोपड्यावर काय केव्हाही हल्ले करून मर्दुमकी गाजवता येतेच
सवर्ण सायकीत सुवर्ण मुलामा कास्ट ॲट्रोसिटी ॲक्टविरोधात
तुझा खर्च लागला वाढू
सांग कितीचं कर्ज काढू
उरलंसुरलंच तर उष्टं शिळंपाकं ते देतील
पुन्हा साफसफाईसाठी शेवटी तुमच्याच हाती झाडू
रांगत रांगेत ट्रॅफिक ज्याम
मज्जा मज्या ज्याम मज्जा ज्याम

बोलेरो पेजेरो इनोवा क्वालीस वालीस इब्लीस काय काय
ब्रँन्डच्या महागड्या मोठाल्या गाड्या
आरक्षणमागणीचा तर्कटी धुराळा डोळ्यांत डोक्यात ज्याम
गटारनाल्यात आकंठ अहोरात्र उतरणाऱ्या
मैला काढणाऱ्या सफाई कामगारांच्या पोस्टसाठी अप्लाय करणार काय
तिथं शंभर टक्के आरक्षण त्यांच्यासाठीच का हो...
कस्से सुटतील बेरोजगारीचे शेतीचे प्रश्न नुस्त्या आरक्षणानं बाई
सावित्रीच्या लेकींनो कोण कुणाला टोपी घाल्तंय
अशा कशा फसत चालल्याहात जातवर्गपितृसत्तेच्या भुलभुलैय्यात
आता काय एकच तेवढ्या जिजाबाई
बाकी सगळ्या झिजाबाई
झिजाऽ बाई झिजाऽऽ झिजाऽ बाई

मग काय
पेग हाणला काय न् नाय हाणला काय
नाएन्टी सिक्सची नशा चढतेच
रेझ युवर व्हाइस... भावा
कुणबी मातला न् पाटील जाला
कुणबी मातला न् मराठा जाला
कुणीही खाइल फुलेशाहूआंबेडकर नामाचा पराठा जाला
कुळवाडीभूषण शाक्त शिवराय शंबुराय पुतळ्यातल्या पुतळ्यात शरमिंदा
म्हाराज तुमी आग्ऱ्याच्या कैदेतून सुटलात सहीसलामत
पन आता जातजमातवाद्यांच्या कैदेतून कधी हो सुटका होणार आपली
काय सांगू दादा
कस्सं सांगू दादा
सांगू किती मी दादा एकतेने येथे नांदा
सांगू किती मी दादा समतेने येथे नांदा
सोयीच्या सोयिरिका येथे हाच वांदा
व्यवहारवादाचे अजबगजब गल्लत गफलत गहजब शेंडी जानवे धोत्रे फेटे पिझ्झा बर्गर
मॉल माल म्येन्यूक्यू बॉल मेन्यू मेनी मेनी हॅप्पी रिटर्न्स ऑफ अब्बेऽऽऽ
मग काय
कमळाबाईच्या हळदीकुंकवाच्या आवतनालाही डोक्यावर पदर घेऊन जाता येईल
घड्याळाचे काटे उल्टे फिरतील!

**-सचिन गरुड**

garudsachin.38@rediffmail.com